

घरात राहणारी माणसं बदलतात
पण त्या वास्तुबद्दलचा जिव्हाळा कायम तसाच राहतो.

PANDIT®
JAVDEKAR

# ‘नवल’ वाटणारी गोष्ट







'नवल' वाटणारी गोष्ट

आकाराच्या, नव्या-जुन्याच्या कल्पनेहुनी मोठे
ज्याला त्याला असते प्यारे ज्याचे त्याचे घरटे









प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात घर घेणे किंवा घर बांधणे ही महत्वाची
आणि अभिमानास्पद गोष्ट असते. मग ते छोटं असो, मोठं असो
किंवा 'नवल' सारखा आलिशान बंगला असो. घर छोटं किंवा मोठं
असू शकतं पण घराविषयीच्या भावना गगनाएवढ्या असतात.
कोणत्याही मोजमापात न बसणाऱ्या!



घराच्या मालकाचे आणि त्याच्या कुटुंबियांचे त्या घराशी एक वेगळेच नाते असते. हे अनामिक आणि अव्यक्त असे  नाते काळाच्या ओघात घडत जाते, मजबूत होत जाते. घर सिमेंट-विटांनी तर बनतेच, पण त्याहूनही जास्त ते आठवणींनी घडते. ‘घराला रंग कोणता द्यायचा?’ इथपासून ते ‘कोणती खोली कोणाची?’ इथपर्यंत प्रत्येक प्रश्नावर  झालेल्या असंख्य चर्चा, बागेतल्या आंब्याच्या झाडाला आलेला पहिला मोहर, व्हरांड्यात बसून घेतलेला पहिल्या पावसाचा आनंद इ. अनेक छोट्या छोट्या गोष्टींची घर ही एक मूर्त आठवण असते.

बदलत्या काळानुसार काही बदल करणं आणि ते मनापासून स्वीकारणं हे सगळ्यांच्याच फायद्याचं असतं. 'नवल' बंगल्याच्या बाबतीत कौस्तुभ ओक, 'नवल' बंगल्याचे मालक यांनी घेतलेला निर्णय असाच एक. येणाऱ्या काळात 'नवल' बंगला जुन्या रुपात अस्तित्वात नसेल, पण तो आठवणींच्या रुपात कायम जिवंत रहावा म्हणून हा प्रपंच!





याच आठवणींना उजाळा देत,
कौस्तुभ ओक यांनी सांगितलेली
'नवल'ची ही नवल वाटणारी गोष्ट....






# ‘नवल’ ज्यांच्यामुळे घडला

कौस्तुभ ओक यांचे वडील ग्रुप कॅप्टन डी. एम. ओक यांनी १९५८ साली हा बंगला बांधला.

१९४१ साली ते हवाई दलात (त्या काळात रॉयल इंडियन एयर फोर्समध्ये) दाखल झाले व जानेवारी १९४२ मध्ये नियुक्त झाले. पुढे खडकवासल्यातील राष्ट्रीय संरक्षण संस्थेचे ते पहिले नं. ३ बटालियन-प्रमुख होते. त्यांनी त्यांच्या हयातीत अनेक सामाजिक कामे केली पण त्यातील दोन गोष्टी अगदी उल्लेखनीय आहेत. हवाई दलात ते ज्या स्टेशनचे प्रमुख होते, तिथे त्यांच्या लक्षात आले की तिथल्या अधिकारी-व्यतिरिक्त कर्मचाऱ्यांना रास्त दरात उत्तम मांस मिळत नसे. त्यांनी त्या स्टेशनमध्येच वराह व कुक्कुटपालनाचे उपक्रम सुरू केले. त्यांच्या कर्मचाऱ्यांची छान सोय झाली. सेवानिवृत्त झाल्यावर, १९६७ साली त्यांनी कोथरूडमध्ये गोपालन (दुधासाठी) व कुक्कुटपालन (अंडी व मांसासाठी) हे उपक्रम हाती घेतले. कुक्कुटपालन यशस्वी झाल्यावर त्यासोबत त्यांनी महानगरपालिकेचा कचरा उचलण्याचा प्रकल्प किती अकार्यक्षम आहे हे स्वत: मेहनत घेऊन व स्वखर्चाने पुण्याच्या नागरिकांना दर्शवून दिले. त्यांच्यापुढाकारामुळे आजची ‘स्वच्छ’ ही संस्था नावारूपाला आली, असे म्हणता येईल.







ग्रुप कॅप्टन डी.एम.ओक



सुधा ओक

कौस्तुभ ओक यांच्या आई स्वतः जातीने 'नवल'च्या बांधकामात लक्ष देत असत. त्या खडकवासल्याहून रोज सकाळी ७ वाजताची एसटी पकडून येत असत आणि 'नवल'ची प्रत्येक वीट नीट भिजली आहे की नाही याची खातरजमा करत.








# ‘नवल’ नावामागची गंमत

‘नवल’ हे नाव कसं पडलं?’ याची एक वेगळीच गोष्ट आहे. ग्रुप कॅप्टन डी. एम. ओक हे हवाई दलात असताना त्यांना ४०० रुपये पगार होता. अर्थात त्याकाळी हा पगार खूप होता. पण इतक्या कमी पैशात तेव्हा एवढा मोठा बंगला बांधता आला हे खूप मोठे नवल असल्याने या बंगल्याचे नाव ‘नवल’ ठेवण्यात आले.













'नवल' वाटणारी गोष्ट








# आठवणीतील एक पान

एखादे घर हेदेखील त्यात राहणाऱ्या माणसांप्रमाणेच घरातील प्रत्येक चांगल्या-वाईट प्रसंगांचे साक्षीदार असते. अशाच प्रसंगांमधील १९६७ सालच्या कोयना भूकंपासंबंधी कौस्तुभ ओक सांगतात, भूकंपाचे हादरे जेव्हा जाणवू लागले तेव्हा ते पहिल्या मजल्यावरील त्यांच्या अभ्यासाच्या खोलीत होते. त्यांच्या अंगावरून आगगाडी जाते आहे की काय असे त्यांना वाटत होते. या भूकंपात बाजूच्या घरांचे थोडे नुकसान झाले मात्र 'नवल'ला काहीही झाले नाही. तो त्याच ताकदीने भूकंपानंतरही उभा होता.

यानिमित्ताने त्यांनी अजून एक आठवण सांगितली ती म्हणजे पुण्यातील महापुराची! त्या कठीण प्रसंगावेळी अनेक घरांमध्ये पाणी शिरले, खूप नुकसान झाले. पुराचे पाणी 'नवल'च्या एन्ट्री गेटपर्यंत यायला सुरुवात झाली होती. परंतु, 'नवल'च्या सुदैवाने पुराचे पाणी एन्ट्री गेटपासूनच ओसरू लागले.

या आणि अशा अनेक प्रसंगांमध्ये 'नवल' अगदी खंबीरपणे त्याच्या कुटुंबियांसोबत उभा होता.


नवल





# भोंडे कॉलनीची शान

'नवल' हा बंगला प्रभात रस्त्याजवळील भोंडे कॉलनीमध्ये १९५८ सालापासून अगदी दिमाखात उभा होता. तेव्हा भोंडे कॉलनीमध्ये अगदी मोजके बंगले होते पण त्यात 'नवल'सारखा सुंदर बंगला कोणताच नव्हता. रस्त्यावरून येणारी-जाणारी मंडळी खूप आश्चर्याने आणि कुतूहलाने 'नवल'कडे बघत असत. त्या बंगल्यासोबतच बंगल्यातील बागदेखील अतिशय सुंदर होती. त्यात असंख्य प्रकारची फळझाडे, फुलझाडे होती. आंबा, चिकू, नारळ, फणस यांसोबतच तगर, सदाफुली, मोगरा आणि जास्वंद ही झाडेही होती. शिवाय ही बाग बंगल्याच्या चहूबाजूंनी असल्याने ती बंगल्याच्या सौंदर्यात एक वेगळीच भर घालत असे. सर्वार्थाने, 'नवल' हा भोंडे कॉलनीची शानच होता.












'नवल' वाटणारी गोष्ट

# वास्तुकलेचा उत्तम नमुना

‘नवल’ मधील प्रत्येक गोष्ट आणि कारागिरी इतकी उत्तम दर्जाची आहे की आज, २०२२ मध्ये, हे सांगावे लागले असते की ‘नवल’ ६४ वर्षे जुना आहे. ‘जुने ते सोने’ ही म्हण ‘नवल’च्या बाबतीत १००% लागू पडते. उत्कृष्ट दर्जाचे बर्मा टीकवुडचे दरवाजे, मोझेक टाईल्स, स्वयंपाकघरातील पांढरा मार्बलचा ओटा, वुडन फ्लोअरिंग, मागच्या बाजूची सुंदर दगडी भिंत इ. अनेक गोष्टी ‘नवल’मध्ये होत्या ज्या आपल्याला सध्याच्या काळात सगळीकडे पाहायला मिळत नाहीत. म्हणूनच ‘नवल’ हा वास्तुकलेचा एक उत्तम नमुना होता.









'नवल' वाटणारी गोष्ट











इथून पुढे 'नवल'चे रंगरूप बदलेल पण कौस्तुभ ओक आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी त्या आठवणी मात्र कायम तिथेच राहतील. 'नवल' हे नाव भोंडे कॉलनीची शान होते आणि कायम राहील. फक्त यापुढे इमारतीच्या रुपात!



